Estd: 1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF-28TH Rank

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.–416 004, महाराष्ट्र
दूरध्वनी2690571, 2693643, 2693730
परीक्षा नियत्रंक कार्यालय दूरध्वनीः 2693176, फॅक्सः 0231&2690655
इतर परीक्षा–2 विभाग विस्तारित दूरध्वनी 2609120 FAX: 0091-0231-2691533 & 0091-0231-269233

**Ref.:No. /SU/EXAM/ 7434** **Date : 22-02-2017**

प्रति,
प्राचार्य/प्राचार्या /संचालक/संचालिका,
शिवाजी विद्यापीठ,
संलग्नित सर्व महाविद्यालये,
कोल्हापूर.

**विषय** – महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या अपूर्ण पात्रता पूर्ण करण्याबाबत.

महोदय/महोदया,

आपणास विदीत आहेच की, ऑक्टों/नोंव्हे, 2016 मध्ये झालेल्या परीक्षांचे निकाल जाहिर करण्याची कार्यवाही सुरू आहे. शैक्षणिक वर्ष 2013 – 14 मध्ये किंवा त्यापूर्वी आपल्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या किंवा दूर शिक्षण विभागाकडून आपल्या महाविद्यालयात स्थलांतराने प्रवेश घेतलेल्या, अशा सर्व विद्यार्थ्यांमधिल ज्या विद्यार्थ्यांची पात्रता अंतीम न झालेमुळे त्यांची यादी या पत्रासोबत विद्यापीठ संकेत स्थळावर ठेवण्यात आलेली आहे. अशा विद्यार्थ्यांचे निकाल पात्रता अपूर्ण या कारणास्तव राखीव ठेवण्यात आलेले आहेत, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त यादीमधील विद्यार्थ्यांची पात्रता कोणत्या कारणासाठी अपूर्ण आहे, याची माहिती पात्रता विभागाकडून घेवून त्याची पात्रता प्रणालीमध्ये पूर्ण करण्यात यावी. अशा पध्दतीने पात्रता पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची यादी पात्रता विभागाकडून परीक्षा विभागाकडे प्राप्त झाल्याशिवाय राखून ठेवलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल जाहिर केले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी व तशी सूचना संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात यावी. यामुळे पुढील समसत्राचा तथा इतर विषयांकरीता परीक्षा अर्ज संबंधिताना भरता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सबब, सोबत यादीमधील आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची पात्रता विनाविलंब उन्हाळी परीक्षा – 2017 चे अर्ज भरून घेण्याच्या मुदतीपूर्वी पूर्ण करून घ्यावी. त्यामुळे विद्यार्थ्यांचे राखीव निकाल वेळेत जाहिर करणे शक्य होईल. विद्यार्थ्यांची पात्रता पूर्ण करणे ही बाब पूर्णतः पात्रता विभाग व संबंधित महाविद्यालय यांचेशी संबंधित असलेने विद्यार्थ्यांना पात्रतेच्या चौकशीसाठी परीक्षा विभागात पाठवू नये, याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/–
उपकुलसचिव